**Review of Research**
**International Online Multidisciplinary Journal**

ISSN 2249-894X | Impact Factor : 3.1402 (UIF) | Volume - 5 | Issue -5 | Feb - 2016



# मुस्लिम मराठी साहित्य

**डॉ. हेमंत म. देशमुख**
**आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा**

**प्रस्तावना**




गेल्या अनेक शतकापासून पिढ्यानपिढया मुस्लिम समाज महाराष्ट्राच्या भाषिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक पर्यावरणात जगतो आहे. महाराष्ट्राच्या खेडोपाडी, शहरोशहरी असलेल्या सूफी संत अवलियांच्या दर्गाहवर सर्वच जाती स्तरावरील स्त्री–पुरूष मोठया श्रध्देने अनेक शतकापासून आजपर्यन्त जात आहेत. यातच सूफी परंपरेतील अनेक सुफींनी मराठी भाषेतून भक्तिकाव्याची निर्मिती केलेली आहे. एवढेच नव्हे तर संत एकनाथ आणि संत तुकाराम महाराज यांची गुरुपरंपरा सुफीअवलीयांशी भिडणारी आहे. आदिलशहासारख्या शासनकर्त्या माणसाने आपल्या विजापूर राज्यात मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा दिला होता. इतकेच नव्हे तर आदिलशहाने स्वत: मराठी भाषेतून काव्यनिर्मितीही केलेली आहे. दक्षिण भारतातील मुस्लिम समाज आज घरादारात जी दखनी भाषा बोलतो ती दखनी भाषा मराठी भाषेतूनच जन्माला आलेली आहे. असे डॉ. श्री. रं. कुळकर्णी यांनी एक स्वतंत्र ग्रंथ लिहून सिध्द केले आहे. या ऐतिहासिकतेतून तर मराठी सारस्वतात मुस्लिम संतकवींची आणि मुस्लिम शाहीर कवींची परंपरा अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते. ही देशी परंपरा दयाळू, कृपाळू इंग्रजांच्या अंमदानीत, सत्तासंघर्षाच्या धमश्चक्रीत विस्कळीत झाली.

भारतीय समाजव्यवस्था ही एक विषमताग्रस्त समाजव्यवस्था आहे. अशा समाजात अनेक जातींच्या नवनिर्मितीच्या आणि सांस्कृतिक सहभागाच्या प्रेरणा मारल्या जात होत्या; ही एक वस्तुस्थिती आहे, जी आपल्याला मान्यच करावी लागते. भारतीय मुस्लिम समाज हाही हिंदूएवढाच जातिग्रस्त असल्यामुळे विषमताग्रस्त आहे. दलित, ग्रामीण, स्त्री, जनवादी चळवळींच्या आधारे मुस्लिम खिश्चन–जैन मराठी साहित्याची चळवळही निर्माण झाली. मुस्लिम जाती जमातींच्या निर्मिती प्रेरणा आणि सांस्कृतिक महत्वकांक्षा निर्माण झाल्या. म्हणूनच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर झालेल्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे मुस्लिम माणूसही साहित्यनिर्मिती करू लागला. स्वत:च्या आणि समाजाच्या अस्तित्वासाठी मुस्लिम मराठी लेखकांना पत्रकारांना आणि सुधारकांना सोलापूर येथे इ.स. १९९० साली मुस्लिम मराठी साहित्य संमेलना'च्या व्यासपीठावर एकत्र यावे लागले. इथेच ठळकपणे मुस्लिम मराठी साहित्याच्या एका नव्या प्रवाहाचा प्रारंभ झाल्याचे स्पष्ट होऊ लागते. हा नवा प्रवाह संपूर्ण मराठी भाविकांची वाङ्मयीन संस्कृती घडवू इच्छिते.

आपल्या भारतातील मुस्लिम समाजाची लोकसंख्या केवळ १२.६% आहे. त्यातला ३५% मुस्लिम समाज हा भूमिहीन समाज आहे आणि शेकडा ४५% समाज हा दारिद्रय रेषेच्या खालच्या स्तरातील जीवन जगतो आहे. भारतातील मुस्लिम समाजाचे राहणीमान, आर्थिक स्तर, व्यवसाय, सांस्कृतिक जीवन हे शेकडा ९६% टक्के हिंदू समाज जीवनाशी संबंधित आहे. त्यामुळे भारतीय संस्कृती ही एक संमिश्र संस्कृतीच आहे.

मुस्लिम मराठी साहित्य समजण्यासाठी प्रथम आजच्या जीवनाच्या दोन बाजू लक्षात घेणे आवश्यक आहे. एकीकडे हिंदू–मुस्लिम संबंधात शेकडो वर्षापासून निर्माण झालेली एक दरी आहे. भारतीय फाळणी आहे, जातीय दंगली आहेत, बाबरी मस्जिदीचा विध्वंस आहे आणि प्रभावशाली हिंदुत्ववादी शक्ती आहे. तर दुसरीकडे सूफी, अवलिया व मध्ययुगीन विविध संप्रदायातील संत कविनी मोठ्य कष्टाने निर्माण केलेला समन्वयाचा, सहजीवनाचा मानवतावादी बंधुत्वाचा रेशमी धागा आहे. भारताच्या निर्मितीत आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात मुस्लिमांचे योगदान हे कधीही न मिटवता येणारे असे आहे.

### मुस्लिम मराठी कविता :

१९८० नंतर मोठया प्रमाणावर मुस्लिम मराठी कवितांपासून होते. प्रा. शहाजिंदे, कवी खावर, ए.के. शेख प्रा. अजीज नदाफ, मुबारक शेख, इलाही जमादार, खलील मोमीन, बाबा महंमद अन्नार, सय्यद अल्लाऊद्दीन, जावेद पाश, डी. के. शेख हे कवी कवितेच्या माध्यमातून साहित्यिक क्षेत्रात आले. विशेष म्हणजे मुस्लिम मराठी साहित्यात कथा, कादंबरी, नाटक वैचारिक साहित्य हे सर्व प्रकार कमी अधिक प्रमाणात हाताळले गेले तरी मुस्लिम मराठी साहित्यिकांनी कविता हेच आपल्या अभिव्यक्तीचे मुख्य माध्यम केले. मराठवाडयातील गावापासून ते कोकण, विदर्भ, प. महाराष्ट्र या सर्व भागातून डझनावारी मुस्लिम मराठी कवी लिहिताना दिसून येतात.

जरी मराठी मुसलमान कवींचे साहित्य चार–पाचशे वर्षापेक्षा जुने असले तरी मुस्लिम मराठी संतांचे मराठी भक्तीकाव्य सतराव्या आणि अठराव्या शतकातील मुस्लिम शाहिरांचे शाहिरी काव्य, भेदक लावण्या, ही काव्यक्षेत्रातील त्यांची कामगीरी आहे. प्रामुख्याने स्वातंत्र्यानंतर विशेषकरून १९८५ नंतर मुस्लिम मराठी कवींनी बदलत्या परिस्थितीतील सामाजिक जाणिवेतून काव्य लिहिले आहे त्यामध्ये कवी, ए. के. शेख यांचे 'ओंजळ', 'जुलूस माझा', 'गुलदस्ता', 'मोरपीस', कवी मुबारक शेख यांचे 'काव्याचे ऋण', 'पायरव', 'सत्यमेव जयते' कवी शहाजिंदे यांचे 'निधर्मी', 'ग्वाही', 'आदम' या कविता संग्रहांनी मराठी साहित्यात मोलाची भर टाकली आहे. विदर्भातील कवी जावेद पाशा यांच्या 'बएत' आणि 'मुहाजीर' हे कवितासंग्रह देखील मराठी साहित्यात खळवळ माजविणारे कवितासंग्रह आहेत. राधेशाम देशमुख यांचे 'अजान' 'कुंपणातील हूंदके', 'मुसलमान' हे कवितासंग्रह मराठी साहित्यात एक मोलाची भर टाकतात. प्रा. सय्यद अल्लाउदीन यांचा 'जिंदाबाद–मुर्दाबाद', डी. के. शेख यांच्या 'पागल पोराच्या कविता' याच मालिकेतील अत्यंत खळबळजनक आणि जळजळीत कविता घेवून नागपूरचे जावेद कुरेशी यांनी विद्रोहाचे रणशिंग फुंकलेले दिसून येते स्वत: जावेद कुरेशी अंगावर ओकणारे क्रांतीकारी व्यक्तिमत्व आहे. त्यांचा 'बएत' हा कवितासंग्रह जसा मुस्लिम वेदनांचा आलेख घेऊन उभा राहतो तसाच हिंदू आणि मुस्लिम जमातवादाला आव्हान देतो.

### मुस्लिम मराठी कादंबरी :

मराठीतील कादंबरी वाङ्मय प्रकाराची परंपरा दीडशे वर्षाहून अधिक आहे. बाबा पद्मजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीपासून सुरू झालेला हा वाङ्मयीन प्रवाह वेगवेगळी वळणे घेत स्थिर होत आहे. असे असले तरी मराठी कादंबरीच्या क्षेत्रात मुस्लिम लेखकांचे योगदान अगदीच अत्यल्प आहे. मराठी कादंबरीच्या सुरूवातीच्या शंभर वर्षामध्ये मुस्लिम कादंबरीकारांची नोंद अगदी अपवादाने झाली आहे. १९३० च्या सुमारास सय्यद अमीन यांच्या 'अबला' या कादंबरीचा उल्लेख आढळतो. त्यानंतर मात्र ६० च्या दशकामध्ये एकाही मुस्लिम कादंबरीकारांची नोंद आढळत नाही. याच दरम्यान हमीद दलवाई यांच्या 'इंधन ने आशय विषय आणि अभिव्यक्तीतील नाविन्य जपत या क्षेत्रात: दमदार पाऊल टाकले आहे. १९७० च्या सुमारास इब्राहिम खान यांची 'अंधाराचे अश्रू' १९६९ ही कादंबीर मराठीतून प्रकाशीत झाली. त्यानंतर दीर्घ कालावधीने फ.म.. शहाजिंदे यांची 'मी–तू' ही पत्रात्मक कादंबरी आली. राजन खान यांनी विशेषत: 'स्क्रीन टेस्ट' १९८४ काफर १९८९ 'यतीम' १९९०, 'शरियत' १९९१, 'हय्यान आणि मजार' १९९५, 'सत्ना गत' १९९८, 'चिमूटभर रूढीवाज आभाळ' १९९९ 'जातवान आणि विनशन' २००३ वळूबनातील कामधेनू अशा कादंबऱ्यांची निर्मिती करून त्यांनी आपला वेगळा असा ठसा उमटविला. मुस्लिम धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था आणि समाजव्यवस्थेचे वास्तवपूर्ण चित्रण करतानाच माणूस हा लेखकाच्या आस्थेचा केंद्रस्थानी असावयास हवा अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. सोबतच १९९९ मध्ये रफिक सूरज याची 'रहबर' ही कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. मुस्लिम समाज रूढी परंपरा या बरोबरच मुस्लिम तरुणांच्या मानसिकतेचा प्रत्यकारी मागोवा त्यांनी आपल्या कादंबरीतून घेतलेला आहे. २००० मध्ये शकील शेख यांची 'जुवा' ही कादंबरी प्रसिध्द झाली. हमीद दलवाई यांच्या 'इंधन' या कादंबरीमुळे मुस्लिम कादंबरीकारांचा समिक्षकांनी अधिक गांभीर्याने विचार केल्याचे दिसते. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडातील महत्वाची कलाकृती म्हणून 'इंधन' विचारात घेतली जाते म्हणूनच राजन खान यांनी 'माणूस' हाच आपल्या लेखनाचा केंद्रबिंदू मानला आहे. 'माणूस' हा केवळ माणूस असतो त्याला जात, धर्म, अशा बंधनानी बंधित करणे त्यांना कदापिही मान्य नाही.

''श्वासाला कुठे असतो धर्म ?
अंगातल्या रक्ताच्या रंगाला कुठं असतो धर्म?
अन्नालाही धर्म नसतो
माणसाच्या मनातल्या वासनांनाही धर्म नसतो
माणसाचा जन्मालाही नसतो धर्म न
मृत्यूलाही नसतो धर्म''

म्हणूनच ज्या दिवशी हे जग सगळ धर्म आणि सगळे भेद यातून मनापासून मुक्त होईल त्या दिवसाणूसन या जगाचं खरं जगणं सुरू होईल.

## मुस्लिम मराठी कथा :

'मुस्लिम मराठी साहित्य म्हणजे मराठीतून लेखन करणाऱ्या मुस्लिम लेखकांचे साहित्य' असे मान्य करून मुस्लिम लेखकाने लिहिलेली मराठी कथा होय. कथालेखन करणाच्या मुस्लिम मराठी कथाकारांची संख्येने मोजकी पण सशक्त अशी फळीच दिसून येते, हमीद दलवाई, यु. म. पठाण, मल्लिका अमर शेख, बशीर मुजावर, एहतेशाम देशमुख, राजन खान, जावदे कुरेशी, सलीम शेख, खलीलखान, मुबारक शेख, रफिक सूज या लेखकांनी सशक्त अशी कथा लिहिली आहे.

दलवाईच्या 'छप्पर' कथेतील छप्पर प्रतिकात्मक आहे. छप्पर म्हणजे खरे तर निवारा, आधार, पण या निवारापणाच्या ओझ्याखाली खूप अंधार म्हणजे अज्ञान, अंधश्रध्दा 'कफनचोर' या कथेतील दारिद्रयाने मेताकुटीस आलेला रसूल रात्री–अपरात्री कबरस्तानात कबरी खोदून, प्रेताला गुंडाळलेले कफनाचे कापड चोरून नेत असतो. सोबतच यू. म. पठाणांनी संख्येने मोजकेच कथा लेखन केले असले तरी दीर्घकाळापर्यंत त्यांनी कथालेखनातील सातत्य टिकवून ठेवले आहे. 'दफन', 'साया', 'यतिम' 'जित्राब', 'खानसामा', 'अंतर' या सारख्या कथा तपासून पाहण्याजोग्या आहेत. मुस्लिम मराठी कथाकारांमध्ये बशीर मुजावर यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांचे 'वर्तुळ', 'गूठकथा', आणि 'अद्वैत' त्यांच्या बऱ्याच कथातून मध्यमवर्गीय जीवनातील सूक्ष्म संघर्ष, नाटय, कारूण्य, वैचारिक ताणतणाव प्रकट झाले आहेत. 'हॅटट्रिक', 'पहाट', 'पुस्तक' अशा अनेक कथांतन पांढरपेशे जीवन प्रकट झाले आहे.

राजन खान हे आजचे आघाडीचे कथाकार आहेत. त्याचे 'हिलाल' आणि 'मजार व हयात १९९५ हे दोन कथा संग्रह प्रसिध्द झाले आहे. कष्टाळू, उपेक्षित, मोलमजूरी करून जगणारे, सर्वसामान्य गरिबीत जगणाऱ्या मुस्लिमांचे जीवनचित्रण, जावेद कुरेशी आणि मुबारक शेख या दोन उमेदीच्या लेखकांच्या कथेत दिसून येते. जावेद कुरेशी यांच्या 'औरंगजेब' आणि 'जोशी' १९९२ या कथा संग्रहात एकूण वीस कथा संग्रहित झाल्या आहेत. जावदे कुरेशी हे सामाजिक बांधिलकी मानणारे लेखक आहे. या बांधिलकीमुळे समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या विषमतेची चित्रे रेखाटण्यास ते उद्युक्त झालेले दिसतात. रफीक सूरज यांनी सातत्याने विपुल कथा लेखन केले असले तरी त्यंचा आतापर्यंत 'आभाळ' १९९० हा एकमेव कथासंग्रह प्रसिध्द झालेला आहे.

## मुस्लिम मराठी नाटक :

नाटक या कला प्रकाराचा मानवी अस्तित्वाशी निकटचा संबंध आहे. किंबहुना नाटक हे मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. अमर शेखांची लेखणी म्हणजे प्रबोधनाची धगधगणारी मशाल होती. 'पहिला बळी' हे नाटक तर त्याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणता येईल. 'जीवन संपले जगण्याआधी' या महमद नैसर्गी यांच्या नाटकाचा जीवनातील शोकात्म अनुभवाचं स्वरूप प्रकट करणारं नाटक म्हणून विशेषत्वानं उल्लेख करावा लागेल.

एक प्रतिभावंत नाटककार म्हणून शफाअतखान यांचा उल्लेख करता येईल. 'मुंबईचे कावळे', 'किस्से', 'भूमितीचा फार्स', 'राहिले दूर घर माझे' आणि 'शोभायात्रा' ही त्यांची प्रेक्षकांना शेवटपर्यंत गुंतवून ठेवणारी नाटकं मानवीवृत्ती आणि प्रवृत्ती यातील भावनात्मक संघर्ष या नाटकातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. १९९३ साली प्रकाशित झालेल्या नाटयसंहितापैकी लक्षवेधी म्हणून जावेद कुरेशी यांच्या 'चित्कार' हे नाटक प्रभावशाली आहे.

## मुस्लिम मराठी वैचारिक लेखन :

वैचारिक क्षेत्रात लिखाण करून आपले लक्ष वेधून घेणाऱ्यामध्ये हमीद दलवाई, अब्दुल कादर मुकादम, प्रा. फ. ह. बेन्नूर, प्रा. फ. म. शहाजिंदे, अनिस चिश्ती, हुसेन जमादार, अन्वर राजन, मुमताज रहिमतपुरे डॉ. यु. म. पठाण मुजफ्फर हुसेन हे प्रमुख आहेत. जावेद कुरेशी सारख्या लेखकांचे लेखन सामाजिक प्रश्नांना भिडणारे आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे समर्थक असलेले यदुनाथ यांनी विविध मुस्लिम प्रश्नावर विपुल लेखन केले आहे. मुस्लिम प्रश्नावर इतरही लेखकांनी लेखन केले आहे त्या मध्ये सेतु माधवराव पगडी, शेषराव मोरे, प्रतिभा रानडे, श्रीपाद जोशी, नरहर कुरूंदकर, रावसाहेब कसबे, डॉ. रा. चिं. ढेरे यांनी मुस्लिम मराठी संतांच्या विषयावर संशोधन करून जे लिखाण केलेले आहे त्यांचे हे योगदान अतिशय मूल्यवान आहे सोबतच असगरअली इंजिनिअर हे विविध पुस्तके व कुराण हदीस यांच्या आधाराने बोलतात. स्त्रियांना इस्लामने दिलेले अधिकार समाज तिच्यापर्यंत पोहोचू देत नाही ही त्यांची प्रमुख मांडणी आहे. असे हे महाराष्ट्रात मुस्लिम समाजामध्ये महत्वाचे वैचारिक योगदान करणारे लेखक आहेत.

## मुस्लिम मराठी आत्मचरित्रे :

मुस्लिम मराठी आत्मचरित्रात्मक वाङ्मयात पद्मश्री कॅप्टन फकीर मोहम्मद जुवळे यांचे 'माझ्या दर्यावर्दी जीवनातील भरती ओहोटी' आणि शांतादेवी तडवी यांचे 'संघी प्रकाशात' या दोन आत्मचरित्रांचा तपशील मिळतो पण डॉ. अजील नदाफाचे 'जाग्या झालेल्या सावल्या' इब्राहिम खान यांचे 'मुस्लिम महार', मल्लिका अमर शेख यांचे 'मला उद्ध्वस्त व्हायचंच', हुसेन जमादारांचे 'जिहाद' नसीमा हुरजूक यांचे 'चाकाची खुर्ची', आणि हुसेन दलवाई यांचे 'क्षितिजे अपार' ही आत्मचरित्रे आहेत.

अशाप्रकारे मराठी आत्मचरित्रात्मक वाङ्मयाचे दालन इतर भाषेतील मराठीत अनुवादीत झालेल्या मुस्लिम मराठी आत्मचरित्रामुळेही समृध्द होत आहे.

## निष्कर्ष :

१. हल्ली जे मुस्लिम मराठी लेखक साहित्य निर्मिती करीत आहेत त्यांना स्वतंत्र व्यासपीठ मिळावे.
२. मध्ययुगीन व आधुनिक मुस्लिम मराठी साहित्याची जी परंपरा आहे ती उजागर व अधिक स्पष्ट केली जावी.
३. भारतीय मुस्लिम समाजाकडे एक तर केवळ राजकीय दृष्टीने नसता जमातवादी व जातीयवादी नजरेनेच पाहिले जाते विचार केला जातो. हा दृष्टिकोन बदलण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
४. वास्तविक आज जे मुस्लिम मराठी साहित्य निर्माण होत आहे त्याकडे कुणाचेच लक्ष नाही. त्यामुळे याकडे लक्ष वेधण्यासाठी या अशा संमेलनांची आवश्यकता आहे.
५. मुस्लिम समाज अज्ञान, मूलभूतता, परभृतता, बेकारी, विभाजन, दंगेधोपे, अल्पसंख्यांक भयग्रस्तता, दारिद्रय या समस्यांमुळे दिशाहीन बनून वाईट अवस्थेत आहे. यातून त्याला बाहेर काढण्यासाठी वैचारिक संमेलनांची आवश्यकता आहे.

## संदर्भ सूची ग्रंथ :

१. मुस्लिम मराठी साहित्य : परंपरा स्वरूप आणि लेखकसूची – फ. म. शहाजिदे
२. इस्लाम मानवतावाद शिकवितो, आतंकवाद नव्हे – इम्रान पिंजारी